


कळवा शिक्षांगण, डिसेंबर 2022 रोजी श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्ट व स्त्री मुक्ती संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आले, कळवा शिक्षांगण मध्ये गरीब गरजू व कचरावेचक महिलांचे एकूण 35 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. कळवा शिक्षांगण  साठी आर्थिक सहाय्य श्री रामन सुब्रमण्यम सर यांच्यामार्फत होत आहे.




कळवा शिक्षा अंगण मध्ये अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी अनेक उपक्रम आयोजित केले जातात.

5/6/25

कळवा अभ्यासवर्ग,जागतिक पर्यावरण दिना निमित्त पर्यावरणाचे रक्षण करणे , काळजी घेणे माहिती दिली लहान मुलांनी झाडाचे चित्र काढून रंगविले , मोठ्या मुलांनी झाडाचे उपयोग व माहिती लिहिली.



23/6/25

कळवा अभ्यासवर्ग, पालक सभा आयोजित केली होती , मुलांची उपस्थिती, अभ्यास , व फी साठी भरले जाणारे फॉर्म याची तयारी. याबाबत चर्चा करण्यात आली,



28/6/25

कळवा अभ्यासवर्ग, स्त्री मुक्ती संघटने तर्फे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते, Dr. Pradnya madam यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली



5/7/25

आषाढी एकादशी ची माहिती दिली , सिंथेल संस्थेच्या वतीने रजनी मॅडम यांनी वर्गाला भेट दिली , सोबत संगीता मॅडम पण होत्या ,वैयक्तिक स्वच्छता,wash activity , शारीरिक स्वच्छता, याबद्दल खेळाच्या माध्यमातून माहिती दिली



11/8/25

कळवा अभ्यासवर्ग रक्षाबंधन साजरे करण्यात आले.



23/8/25

श्रीराम राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्ट कडून 35 विद्यार्थ्यांना युनिफॉर्म वाटप करण्यात आले ,व सर्व विद्यार्थ्यांना पेन, पेन्सिल , खोडरबर, पट्टी, खडू कलर, वॉटर कलर, चित्रकला वही, नोट बुक्स इ शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



25/8/25

कळवा अभ्यासवर्ग, विषय मराठी श्रुतलेखन ,गणित अपूर्णांक शाब्दिक उदाहरणे गुणाकार , विद्यार्थ्यांना घरूनच गणपतीची मूर्ती बनवून आणण्यास सांगितली होती , तसेच चित्र देखील काढून आणण्यास सांगितले होते .



5/9/25

कळवा अभ्यासवर्ग शिक्षक दिन साजरा करण्यात आला , मोठ्या इयत्तेतील विद्यार्थी शिक्षक बनले होते ,त्यांनी इतर विद्यार्थ्यांना गणित ,इंग्रजी , मराठी , चित्रकला he विषय शिकविले व शेवटी शिक्षकांबद्दल मनोगत व्यक्त केले.



27/9/25

कळवा अभ्यासवर्ग गरबा आयोजन करण्यात आले होते ,



13/11/25

कळवा अभ्यासवर्ग, विद्यार्थ्यांनी सकाळ वर्तमान पत्रातील शब्दकोडे , puzzles सोडविले , माहिती वाचन केली,.



14/11/25

कळवा अभ्यासवर्ग बालदिन निमित्त विद्यार्थ्यांना कार्टून थीम दिली होती त्यावर विद्यार्थ्यांनी चित्र काढले, व खेळ घेण्यात आले .



18/11/25 कळवा अभ्यासवर्ग,

आज मुलांना इंग्रजी फ्लॅश कार्ड दाखवून स्पेलिंग बोलण्यास सांगितले , व इंगजी वाक्य दाखवून ऍक्शन करून इतर मुलांनी ते ओळखणे असा खेळ घेतला .




24/11/25

कळवा अभ्यासवर्ग विषय इंग्रजी,Animal sounds guessing , reading writing with action.




26/11/25

कळवा अभ्यासवर्ग संविधान दिन साजरा करण्यात आला , चित्रकला स्पर्धा घेण्यात आली , संपूर्ण शिक्षा कडून आलेली MBA che विद्यार्थी त्यांनी चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे वाटप केली , संविधान वाचन करण्यात आले, त्यांनी विद्यार्थ्यांना अल्पोपहार दिला , त्यांच्या intership cha शेवटचा दिवस होता म्हणून ही पार्टी आयोजित करण्यात आली होती , विद्यार्थ्यांनी देखील त्यांना छोटीसी भेटवस्तू , व अभ्यासवर्गातील ग्रुप cha फोटो कागदी फ्रेम बनवून भेट दिली , सर्वांना खूप आनंद झाला,



29/11/25

कळवा अभ्यासवर्ग इंग्रजी चार्ट वाचन , गणित भागाकार , आणि खेळ.



2/12/25

कळवा अभ्यासवर्ग, science home work, english spelling reading writing, खेळ,



3/1/2026

3 जानेवारी 2026 क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दिघा येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, या कार्यक्रमास श्रीमती संघटनेच्या वतीने माननीय वृषाली मगदूम मॅडम, आंबेडकर चळवळीच्या सामाजिक कार्यकर्त्या माननीय छाया कोरेगावकर मॅडम उपस्थित होत्या तसेच रबाळे कळवा व दिघा येथील सर्व कचरा वेतन महिला व श्री मुक्ती संघटनेच्या सर्व कार्यकर्त्या उपस्थित होत्या, माननीय छाया कोरेगावकर मॅडम व वृषाली मॅडम यांनी सर्व कचरावेचक महिलांना सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती सांगितली व त्यातून प्रेरक विचार घेऊन आपले जीवन सार्थकी करावे असे मार्गदर्शन केले, यावेळी दिघा येथील विद्यार्थिनींनी सावित्रीची ओवी गायली, व कळवा येथील विद्यार्थिनींनी सावित्रीबाईंच्या सुंदर गाण्यावर नृत्य सादर केले, एकूण शंभर महिला कार्यक्रमास उपस्थित होत्या.



19/1/26

कळवा अभ्यासवर्ग, सर्व मुलांसाठी सेल्फ अवेअरनेस या विषयावर TISS चे विद्यार्थिनी सुबीत्रा हिने मुलांना मार्गदर्शन केले, किशोरवयीन मुलींसाठी संघर्षाला सामोरे कसे जावे याबद्दल खेळ व चर्चेच्या माध्यमातून मार्गदर्शन केले.



27/2/26

कळवा अभ्यासवर्ग मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषेचे महत्व सांगितले , कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवस हा मराठी राजभाषा दिन mhanun साजरा केला जातो , विद्यार्थ्यांकडून मराठी भाषेची बाराखडी व्यंजन व स्वर लिहून घेतले, विद्यार्थ्यांनी मराठी भाषा निमित्त भाषण केले.



28/2/26

कळवा अभ्यासवर्ग विषय विज्ञान , राष्ट्रीय विज्ञान दिनाची माहिती सांगितली.



5/3/26

कळवा अभ्यासवर्ग विषय इंग्रजी, अजित सर दुपारी तीन वाजता विधवा महिलांच्या घरी विजीट करण्यासाठी आले होते, त्यांच्यासोबत विधवा महिलांच्या घरी व्हिजिट केली, अजित सरांनी कळवा अभ्यास वर्गातील सात विद्यार्थ्यांचे फीचे चेक दिले, विद्यार्थी व  पालक यांना चेक देण्यात आले,



20/3/26 व 21/3/26

स्त्रीमुक्ती संघटनेतर्फे या दोन दिवशी पनवेल येथे विद्‌यार्थ्यांसाठी निवासी शिबिर आयोजित करण्यात आले होते, विद्‌यार्थ्यांसाठी विविध विषयांवर व्याख्यान व चर्चासत्रे तसेच मनोरंजनात्मक खेळ आयोजित करण्यात आले होते.







27/3/26

कळवा अभ्यासवर्ग विषय इंग्रजी, Good Habits writing and reading .






15 / 2/ 2026

श्रीराम  राधाकृष्णन मेमोरियल ट्रस्ट  तर्फे दर वर्षी प्रमाणे वार्षिक स्नेहसंमेलन  आयोजित करण्यात आले होते.त्या मध्ये कळवा शिक्षणांगण  मधील एकूण 12 विद्यार्थ्यांनी कोळी नृत्य  व  देश भक्ती पर  नृत्य सादर केले होते.

